**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती आणि जनसंपर्क विभाग**
**प्रेसनोट**

## ➢ मिरा भाईंदर महानगर पालिकेने स्थापन केलेल्या RRR सेंटर मार्फत गरजूंना सुयोग्य साहित्यांचे वाटप

राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी दिनांक २ ऑक्टोंबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या जयंतीनिमित्त पूर्वतयारी म्हणून स्वच्छता ही सेवा* पंधरवडा साजरा केला जात आहे

याच स्वच्छता ही सेवा अन्तर्गत केंद्रीय गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये RRR सेंटर म्हणजेच Reduce, Reuse and Recycle center सहा ठिकाणी अत्यंत सुव्यवस्थितपणे सुरू आहेत. मनपा आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर यांच्या कल्पनेतून राबविण्यात आलेल्या RRR सेंटरच्या माध्यमातून मिरा भाईंदर शहरातील नागरिकांनी डोनेट केलेल्या वापरण्याजोग्या साहित्यांचे वाटप मिरा भाईंदर मनपा उपायुक्त श्री.संजय बांगर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.मिरा भाईंदर शहरातील २०० गरजू नागरिकांना याचा लाभ मिळाला असून त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद खरच टिपण्या सारखा होता.या सगळ्यांनी मिरा भाईंदर महानगर पालिकेचे मनापासून आभार मानले आहेत.

शहरातील ६ ठिकाणी अविरत सुरू असलेल्या या RRR सेंटरला दिलेल्या उदंड प्रतिसादाबद्दल मिरा भाईंदर शहरातील दानशूर सुजाण नागरिकांचे विशेष आभार मानून माननिय उपायुक्त यांनी RRR सेंटर स्थापनेचा मुख्य हेतू खऱ्या अर्थाने साध्य होत आहे असे म्हणत समाधान व्यक्त केले. या वाटपाच्या वेळी माननिय उपायुक्त समवेत मिरा भाईंदर महानगर पालिकेचे इतर अधिकारी ,कर्मचारी आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित होते.